RNI : MHMAR/25/A0848 epaper.shikshanastra.com Shikshanastra@gmail.com 79722 12030 79722 12030

दैनिक शिक्षण अस्त्र

बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२६ अंक ●२५८● ● किमंत २ रू ● ● पाने 4 ● संपादक ः संदिप नारायण ठाकरे

# लिपिक परीक्षेत गोंधळाचा तास ः न्यायालयीन पदाच्या टंकलेखन चाचणीत त्रुटी

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : परीक्षांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी सरकारकडून पावले उचलली जात असतानाच न्यायालयीन लिपिकपदाच्या भरती प्रक्रियेदरम्यान रविवारी गोंधळ उडाला. या पदासाठी घेण्यात आलेली लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची रविवारी टंकलेखनाची परीक्षा होती. मात्र यासाठी निश्चित केलेल्या केंद्रांतील कम्प्युटरमध्ये असंख्य त्रुटी होत्या. यामुळे कल्याण, छत्रपती संभाजीनगर, भंडारा अशा अनेक ठिकाणी उमेदवारांना सायंकाळी उशिरापर्यंत प्रतीक्षा करूनही परीक्षा देता आली नाही.

छत्रपती संभाजीनगरमध्ये तर संतप्त उमेदवारांनी ठिय्या आंदोलन केले. कॉंक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके हेदेखील या आंदोलनात सहभागी झाले. फेरपरीक्षा घेण्याची मागणी त्यांनी केली. कल्याणमध्ये रात्री उशिरापर्यंत थांबलेल्या परीक्षार्थींना कोणतेही समाधानकारक उत्तर न देता केंद्रातून निघालेल्या न्यायाधीशांची गाडी अडवून उमेदवारांनी जाब विचारला. यामुळे काही काल तणावाचे वातावरण निर्माण झाले. संस्थाचालकांनी परीक्षेतील गोंधळाची जबाबदारी स्वीकारल्यावर उमेदवारांनी ही गाडी जाऊ दिली. पोलिस संरक्षणात न्यायाधीश निघून गेले.

जिनियन प्रा. लि. केंद्र या परीक्षेसाठी निश्चित करण्यात आले होते. येथे अलिबाग, मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, बदलापूर, भिवंडी येथून 750 उमेदवार आले होते. या केंद्राच्या नावाचा फलकच नसल्याने ते शोधताना सर्वप्रथम उमेदवारांची धांदल उडाली. नंतर प्रश्नांची गर्दी वाढतच गेली. सकाळी 6 वाजल्यापासून हे उमेदवार केंद्रावर उपस्थित होते, पण कम्प्युटर, नियोजनातील विविध त्रुटींमुळे अनेकांना संध्याकाळपर्यंतही परीक्षा देता आली नाही. कम्प्युटर जुने होते. कीबोर्ड बंद होते. शिवाय सर्व्हर डाउन होते. या केंद्रावर पिण्याच्या पाण्याची, तसेच स्वच्छतागृहांची सोय नसल्याने सकाळपासून आलेल्या उमेदवारांचे प्रचंड हाल झाले. सकाळी 10 वाजता परीक्षेसाठी गेलेले उमेदवार संध्याकाळी 4 वाजता बाहेर पडले. 12.30 ते 1.30 या वेळेत परीक्षा देण्यासाठी उपस्थित असलेले उमेदवार संध्याकाळपर्यंत केंद्राबाहेर ताटकळत होते. यामुळे उमेदवारांनी पशासनाला जाब विचारला.

छत्रपती संभाजीनगरातील सेव्हन हिल परिसरातील सुराणानगर येथील परीक्षा केंद्रावरही या परीक्षेदरम्यान मोठा गोंधळ उडाल्याचे समोर आले आहे. परीक्षा सुरू होताच अचानक सर्व्हर डाउन झाल्याचा आरोप परीक्षार्थी उमेदवारांकडून करण्यात आला. केंद्राबाहेर उमेदवारांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली, ठिय्या दिला. भंडा-यातही अशाच समस्या उद्भवल्या. दरम्यान, याबाबतचा अहवाल उच्च न्यायालयाकडे सादर केला जाणार असून त्यानंतर निर्णय घेतला जाईल, असे न्यायालयीन अधिका-यांनी सांगितले.

**वर्षभरात तीन वेळा गोंधळ**

यापूर्वी भरती प्रक्रियेतील तीन परीक्षा कल्याणच्या केंद्रावर घेण्यात आल्या, मात्र तिन्ही वेळा या केंद्रावर असलेल्या असुविधा आणि बंद पडलेल्या कम्प्युटरमुळे उमेदवारांना मनस्ताप सहन करावा लागला.

> योग्यरित्या काम करत नव्हते. सर्व्हर बिघाड अशा विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत. त्यांना समर्थन देण्यासाठी आंदोलनात सहभागी झालो आहे. मुलांच्या मागण्या सोडविल्या जात नाहीत, तोपर्यंत त्यांच्या सोबत आहे.
>
> अभिजित दीपके, संस्थापक, कॉंक्रोच जनता पार्टी

## परीक्षेचे नियोजन

परीक्षा केंद्रांवरील परीक्षार्थी उमेदवारांनी दिलेल्या माहितीनुसार 1332 पदांसाठीची भरती प्रक्रिया होत आहे. त्यात एप्रिलमधील लेखी परीक्षेनंतर ही टंकलेखनाची परीक्षा होत आहे. लेखी परीक्षेला एक लाख 19 हजार 991 जणांनी नोंदणी केली होती. त्यातील टायपिंग स्किल परीक्षेला 11 हजार 617 जण पात्र ठरले. यानंतर मुलाखतीचा टप्पा असणार आहे.

# PAT परीक्षा वास्तवताः भीषण मग हया परीक्षेचा अटटाहास कशासाठी ?

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : PAT चाचणी ( Periodic Assessment Test - नियतकालिक मूल्यमापन चाचणी) ही महाराष्ट्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची प्रगती तपासण्यासाठी घेतली जाणारी महत्त्वाची परीक्षा आहे. SCERT (राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद) मार्फत ही परीक्षा आयोजित केली जाते.

### 1.परीक्षेचे स्वरूप व उद्दिष्ट

उद्दिष्ट: विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती ( Learning Outcomes) तपासणे आणि त्यांना कोणत्या विषयात अधिक मदतीची गरज आहे हे समजणे. इयत्ता: इयत्ता 2 री ते 8 वी (काही टप्प्यांत 9 वी) पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी. शाळा: शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जि. प., म. न. पा.) शाळा आणि सर्व अनुदानित शाळा.

### 2. समाविष्ट विषय

प्रथम भाषा (मराठी/इंग्रजी/माध्यमानुसार) गणित तृतीय भाषा (इंग्रजी)

### 3. PAT चे मुख्य टप्पे (असेसमेंट)

वर्षातून साधारणपणे तीन टप्प्यांत ही चाचणी घेतली जाते:

अ. पायाभूत चाचणी (Baseline Test): सत्राच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांची मूळ क्षमता तपासण्यासाठी.

ब. संकलित मूल्यमापन चाचणी 1 (PAT-1): प्रथम सत्राच्या शेवटी (साधारण ऑक्टोबर).

3. संकलित मूल्यमापन चाचणी 2 (PAT-2): द्वितीय सत्राच्या शेवटी (साधारण एप्रिल).

### 4. महत्त्वाची वैशिष्ट्ये

(SCERT) पाठवल्या जातात.

* विद्यार्थ्यांच्या गुणांची ऑनलाइन नोंदणी (शब्दफित छहात / ह्यदिय शमकिस्हा खएन्दरा पोर्टलवर) केली जाते.

* या परीक्षेच्या गुणांचा आधार घेऊन शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासात आवश्यक सुधारणा करण्यासाठी मदत होते.

## तज्ञ, शिक्षक आणि समीक्षकांच्या मते




शिक्षण क्षेत्रातील तज्ञ, शिक्षक आणि समीक्षकांच्या मते, महाराष्ट्रातील शाळांमध्ये राबवली जाणारी Periodic Assessment Test (PAT / नियतकालिक मूल्यमापन चाचणी) ही संकल्पना तत्त्वतः चांगली असली तरी, तिच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत आलेल्या गोंधळामुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे ही परीक्षा पूर्णपणे यशस्वी झालेली नाही.

समीक्षक आणि शिक्षकांनी या चाचणीबाबत खालील महत्त्वाचे मुद्दे व आक्षेप मांडले आहेत:

### 1. चांगल्या बाजू (सकारात्मक दृष्टिकोन)

अ.मूलभूत क्षमतांचे मूल्यमापन: विद्यार्थ्यांची भाषा (मराठी, इंग्रजी) आणि गणित विषयातील मूलभूत प्रगती व उणिवा समजून घेण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त मानला जातो.

ब.एकसमान दर्जा: संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी आणि एकाच दर्जाच्या प्रश्नपत्रिकांद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याचा राज्य सरकारचा हा उद्देश योग्य आहे.

### 2. समीक्षक व शिक्षकांचे मुख्य आक्षेप (अयशस्वीतेची कारणे)

अ.प्रश्नपत्रिकांचा तुटवडा व गोंधळ: अनेक शाळांमध्ये पटसंख्येपेक्षा कमी प्रश्नपत्रिका पोहोचल्याने शिक्षकांना स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करून शेवटच्या क्षणी झेरॉक्स काढाव्या लागल्या.

ब.प्रश्नपत्रिका लीक होणे: काही ठिकाणी परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर लीक झाल्याने परीक्षेच्या गोपनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

विश्लेषण (Analysis Report) चा अभाव: विद्यार्थ्यांचे गुण पोर्टलवर अपलोड केल्यानंतर राज्य पातळीवरून शिक्षकांना किंवा शाळांना कोणताही विश्लेषणात्मक अहवाल किंवा सुधारणात्मक उपाययोजना दिल्या जात नाहीत, ज्यामुळे हा केवळ एक 'औपचारिकता' किंवा 'कागदी घोडे नाचवण्याचा' प्रकार बनला आहे.

शिक्षकांवर वाढता ताण: सातत्याने विविध चाचण्या आणि ऑनलाईन माहिती अपलोड करण्याच्या कामांमुळे शिक्षकांचा अध्यापनासाठी मिळणारा वेळ कमी होत आहे.

मूल्यमापन व निष्कर्ष थोडक्यात सांगायचे तर: PAT चाचणीचा उद्देश योग्य असला, तरी नियोजनाचा अभाव, प्रश्नपत्रिका वितरणामधील गोंधळ आणि गुणांच्या विश्लेषणाबाबतची उदासीनता यामुळे समीक्षकांच्या मते ही चाचणी मैदानावर अंशतः अपयशी ठरली आहे. जोपर्यंत शासन या चाचण्यांचे योग्य विश्लेषण करून शिक्षकांना मार्गदर्शन करत नाही, तोपर्यंत याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फायदा होणार नाही.



# शिक्षणसम्राटांचे खिसे भरण्यासाठीच सरकारी शाळा बंद पाडण्याचा डाव

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : हिंगोली : 'स्वातंत्र्याला 80 वर्षे उलटून गेली, तरी आपण ग्रामीण भागातील शाळांमध्ये साधे पिण्याचे पाणी, मुलांना बसायला बेंचेस, स्वच्छ स्वच्छतागृहे देऊ शकलो नाही. एकीकडे नवीन संसद, नवीन पीएम हाऊस, मंत्र्यांचे फार्महाऊस बांधले जात आहेत. खासगी शाळांचे खिसे भरण्यासाठी देशातील हजारो सरकारी शाळा बंद पाडल्या जात आहेत,' असा आरोप कॉंक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी माध्यमांशी संवाद साधताना केला. त्यांनी हिंगोलीत 'सरकारी स्कूल ठीक करो' अभियानाचा शुभारंभ हिंगोली तालुक्यातील संतुक पिंपरी येथून केला. येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिल्यानंतर सुविधांचा अभाव असल्याचे आढळले. त्यानंतर त्यांनी राज्य सरकारवर टीका केली. अभिजित दिपके यांनी 15 ऑगस्टपासून 'सरकारी स्कूल ठीक करो' या अभियानाची सुरुवात केली आहे. या अभियानाचा शुभारंभ त्यांनी त्यांच्या मूळ गावी, म्हणजेच हिंगोली तालुक्यातील संतुक पिंपरी येथील जिल्हा परिषद शाळेतून केला. यावेळी त्यांनी शाळेतील विदारक स्थितीवर व सरकारच्या शिक्षण धोरणांवर टीका केली.

## दिपकेंचे सरकारला नवी सुचना : 'सरकारी स्कूल ठीक करो' अभियानाची हिंगोलीतून सुरुवात


संतुक पिंपरी येथील शाळेत दिपकेंनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

### खिडकीला काचा नाहीत, पण उपमुख्यमंत्र्यांचे पोस्टर

संतुक पिंपरी येथील शाळेची पाहणीत दिपके यांना दिसले की, शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी बाके नव्हती. खिडक्यांच्या काचा फुटलेल्या होत्या. त्या झाकण्यासाठी चक्क उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पोस्टरचा वापर केला आहे.

### गाड्या, फार्महाऊस बांधणे थांबवा, आधी शाळा सुधारा

'तुम्ही आमदार-मंत्री झाल्यावर बंगले बांधता. गाड्या घेता. पण मतदारांच्या मुलांच्या भविष्यासाठी तुम्ही काय करता ? आधी शाळा सुधारा असे ते लोकप्रतिनिधींना उद्देशून म्हणाले. 'क्या बोलती पब्लिक' हे नवीन अभियान सप्टेंबरपासून सुरू करणार असल्याचे ते म्हणाले.

### प्रत्येक शाळेला भेटीतून अर्ज भरून घेतला जाणार

राज्यात स्कूल ठीक करो अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानात प्रत्येक शाळेला भेट देऊन अर्ज भरून घेतला जाणार आहे. यामध्ये शाळेत पुरेशा वर्गखोल्या, बसण्यासाठी बेंच आदींची माहिती भरून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.

### 10 वर्षात देशभरात 94 हजार शाळा बंद पाडल्या

माध्यमांशी संवाद साधताना दिपके यांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, 'गेल्या 10 वर्षात देशभरात 94 हजारांहून अधिक सरकारी शाळा बंद पाडण्यात आल्या आहेत. हे सर्व मुद्दाम केले जात आहे. खासगी शाळांना फायदा व्हावा, हा हेतू आहे. कारण या खासगी शाळा मंत्री, आमदार, खासदारांच्याच आहेत.

# उच्चशिक्षणात मुलींची संख्या वाढणार

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, पुणे : 'आठ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील सर्व मुलींचे शिक्षण व परीक्षा शुल्क माफ करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे उच्च शिक्षणातील मुला-मुलींमधील 16 टक्क्यांचा फरक गेल्या वर्षी साडेतीन टक्क्यांवर आला आहे. येत्या शैक्षणिक वर्षात उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.





'सीओईपी' तंत्रज्ञान विद्यापीठाच्या तिसऱ्या पदवी प्रदान समारंभात ते मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती बोलत होते. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शुल्कमाफीच्या निर्णयाचा सकारात्मक परिणाम दिसत असल्याचे पाटील यांनी नमूद केले. चिखली येथे स्वतंत्र संशोधन व्यवस्था उभारण्यात येत असून, त्यासाठी सरकारकडून मोठे आर्थिक पाठबळ आणि 'सीएसआर'च्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. 'सीओईपी' मध्ये 400 विद्यार्थिनी क्षमतेचे वसतिगृह उभारण्यासाठी सरकारी तसेच 'सीएसआर' मधूनही निधी देणार असल्याचे पाटील यांनी जाहीर केले.

# 60 एआय अंगणवाड्या सुरू करून नागपूरने देशात पहिला मान मिळविला

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, नागपूर: स्वातंत्र्यदिन सोहळ्यात कुपोषण घटल्याचा दावा, पालकमंत्र्यांनी मांडला विकासाचा रोडमॅप

जिल्हात 60 एआय अंगणवाड्या सुरू करून नागपूरने देशात पहिला मान मिळविला आहे. या उपक्रमामुळे कुपोषणात घट झाल्याचा दावा करतानाच आरोग्य, सिंचन, पायाभूत सुविधा आणि 'नवीन नागपूर' सह विविध प्रकल्पांच्या माध्यमातून जिल्हा विकासाच्या नव्या टप्प्याकडे वाटचाल करीत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य शासकीय समारंभात बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. जिल्हातील 60 आरोग्य केंद्रांना एनक्यूएएस मानांकन मिळाले असून, 15 स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत 68 'आपला दवाखाना' केंद्रांतून नागरिकांना आरोग्य सेवा दिली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. या समारंभाला खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार डॉ. राजीव पोतदार, विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मीना, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस अधीक्षक हर्ष स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ पोदार, नागरिक आदी उपस्थित होते.

### सिंचन क्षेत्र वाढले

मिहान-एअरपोर्ट परिसरात 82 एकर जागेवर कन्व्हेन्शन, सांस्कृतिक व प्रदर्शन केंद्र उभारण्याची तयारी सुरू आहे. सिंचन क्षेत्रात चिचघाट उपसा सिंचन योजनेतून 3 हजार 715 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. खैरी कालव्याच्या विशेष दुरुस्तीमुळे 473 हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित झाली, तर भिंड-चिचघाट योजनेतून 9 हजार 640 हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळत असल्याचे बावनकुळे म्हणाले.

### आरोग्य सुविधांना बळ

आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून जिल्हातील 93 हजार 914 रुग्णांवर 307 कोटी रुपयांचे मोफत उपचार करण्यात आले आहेत. नागपूर जिल्हात आतापर्यंत 3 लाख 38 हजार 295 आयुष्मान कार्डांचे वितरण करण्यात आल्याची माहितीही पालकमंत्र्यांनी दिली.

# हॉलतिकीटसाठी विद्यार्थ्यांना आता अपार आयडी बंधनकारक

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, मुंबई: आगामी परीक्षांचे हॉलतिकिट मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांकडे अपार आयडी असणे बंधनकारक करण्यात आले आहे. अपार आयडीशिवाय विद्यार्थ्यांचे हॉलतिकिट तयार होणार नसल्याचे मुंबई विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. अपार आयडी, एबीसी आयडी जोडणी किंवा आधार प्रमाणीकरणात अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रवासाचा डिजिटल मागोवा ठेवण्यासाठी 'अपार' (ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्रेशन) आयडी सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी, क्रेडिट्स आणि विविध शैक्षणिक प्रक्रियांना डिजिटल स्वरूपात जोडण्यासाठी या आयडीचा वापर केला जाणार आहे. केंद्र शासनाने विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश दिल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील विविध यंत्रणांकडून त्याची अंमलबजावणी केली जात आहे.

याच पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने आगामी परीक्षांच्या हॉलतिकीटसाठी अपार आयडी अनिवार्य केला आहे. त्यामुळे अपार आयडी नसेल तर हॉलतिकीटच मिळणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. परीक्षा तोंडावर असताना अपार आयडी तयार करताना तांत्रिक अडचणी, आधार प्रमाणीकरणातील त्रुटी किंवा कागदपत्रांमधील विसंगती असल्यास विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. यामुळे आताच आयडी काढा, असे आवाहन केले आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या निर्णयामुळे परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांची धावपळ वाढणार

### महाविद्यालयांवरही जबाबदारी

अपार आयडीची प्रक्रिया अपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना या शिबिराची माहिती देऊन त्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्याची जबाबदारी संलग्न महाविद्यालये व संस्थांवर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना याबाबत तातडीने माहिती देण्याच्या सूचना विद्यापीठाने केल्या आहेत.

### 19 आणि 20 ऑगस्टला विशेष शिबीर

विद्यार्थ्यांच्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या वतीने 19 आणि 20 ऑगस्ट 2026 रोजी विशेष आधार सुविधा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी 10 ते सायंकाळी 4 वाजेपर्यंत कलिना कॅम्पसमधील अल्केश दिनेश मोदी इन्स्टिट्यूट फॉर फायनान्शियल अँड मॅनेजमेंट स्टडीज येथे होणार आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांच्या समन्वयाने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अपार आयडी तयार करणे, अपार आयडी, एबीसी आयडी जोडणे, आधार प्रमाणीकरण, आधारशी जोडलेल्या मोबाईल क्रमांकातील तफावत, नाव, जन्मतारखेतील विसंगती तसेच आधारशी संबंधित इतर अडचणी दूर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# एनटीए'मध्ये अचानक भुकंप 50 हून अधिक अधिका-यांना हटवले

## 10 वरिष्ठ पदांवर नेमणुकीची प्रक्रिया

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, नवी दिल्ली: पेपरफुटी आणि प्रश्नपत्रिकांमधील त्रुटींवरून टीकेची धनी ठरलेल्या राष्ट्रीय चाचणी संस्थेची (एनटीए) तपासणी सुरू झाली आहे. 'परीक्षा पद्धतीत मोठ्या सुधारणा करण्याच्या दृष्टीने 'एनटीए'ने आपल्या 50 हून अधिक अधिका-यांना हटवले असून, 10 वरिष्ठ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे', अशी माहिती शिक्षण मंत्रालयाने सोमवारी दिली.

जूनमध्ये घेतलेल्या 'यूजीसी नेट'च्या इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयांच्या पेपरमधील त्रुटींमुळे त्यांची फेरपरीक्षा घेण्याची घोषणा 'एनटीए'ने रविवारी केली होती. आधीच 'नीट यूजी'च्या पेपरफुटीमुळे झालेली फेरपरीक्षा आणि 'यूजीसी नेट'च्या तीन विषयांच्या फेरपरीक्षेमुळे 'एनटीए' सह सरकार टीकेचे लक्ष्य ठरले. या पार्श्व भूमीवर शिक्षण मंत्रालयाने परीक्षा आता पद्धतीत सुधारणांची 'एक्स'द्वारे माहिती दिली.

'शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांनी उच्च शिक्षण विभागाचे सचिव, 'एनटीए'चे महासंचालक, अन्य वरिष्ठ अधिका-यांसोबत बैठक घेतली. सध्या उद्भवलेल्या मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर आणि संपूर्ण परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने उचललेल्या पावलांबाबत या बैठकीत जोशी यांना माहिती देण्यात आली. 'एनटीएमधून 50 हून अधिक अधिका-यांना हटवण्यात आले आहे. मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, मुख्य आर्थिक अधिकारी, महाव्यवस्थापक (परीक्षा सुरक्षा) आदी 10 वरिष्ठ पदांसाठी जाहिरात देण्यात आली असून, त्यांची नेमणूक करण्यात येत आहे', असे शिक्षण मंत्रालयाने नमूद केले.

'सायबर सुरक्षा, प्रश्नपत्रिका रचना आणि इतर विशेष क्षेत्रांसाठी खासगी क्षेत्रातून विषयतज्ज्ञांनाही सामावून घेतले जात आहे', असे मंत्रलयाने स्पष्ट केले. 'शिक्षणमंत्री यांनी स्थापित परीक्षा नियमावलीचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. तसेच गोपनीय कामकाजाची रचना, सुरक्षित कक्ष, उपकरणे जमा करण्याचे नियम आदींमध्ये युद्धपातळीवर सुधारणा करण्याचे निर्देशही दिले', असेही मंत्रालयाने म्हटले आहे. सर्व परीक्षा प्रक्रियांचे सखोल ऑडिट करून घेतलेल्या सुधारात्मक उपायोजनांबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश 'एनटीए'ला देण्यात आले आहेत.

भविष्यात परीक्षा त्रुटीमुक्त आणि पारदर्शी करणे व्हावयात, हे सुनिश्चित करण्यासाठी अंतर्गत प्रक्रिया आणि नियमांचा आढावा घेण्यात येत आहे. ज्युनिअर रिसर्च फेलोशिप, सहायक प्राध्यापकपदासाठी पात्रता आणि 'पीएचडी' प्रवेश प्रक्रिया आदींसाठी घेण्यात आलेल्या 'यूजीसी नेट'च्या तीन विषयांची फेरपरीक्षा घेण्यात येणार आहे. या फेरपरीक्षेच्या नियोजनानुसार इंग्रजी आणि वाणिज्य विषयाची फेरपरीक्षा 9 सप्टेंबर, तर समाजशास्त्र विषयाची 10 सप्टेंबरला होणार आहे.

**आता एनटिए शिस्त लागणार..!**

1. शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांची वरिष्ठ अधिका-यांसोबत बैठक.
2. परीक्षा पद्धतीत सुधारणांच्या दृष्टीने फेरबदल.
3. भविष्यात परीक्षा त्रुटीमुक्त, पारदर्शी करणे करण्याचा निर्धार.

**'जबाबदारी निश्चित करा'**


नवी दिल्ली : 'यूजीसी नेट'च्या तीन विषयांच्या फेरपरीक्षेवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा उत्तरदायित्वाचा मुद्दा उपस्थित केला. या प्रकाराबद्दल 'एनटीए' नेतृत्वावर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करतानाच राहुल यांनी, 'विद्यार्थ्यांची वर्षे वाया जात असल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून उत्तरे मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही', असे स्पष्ट केले.

# यूजीसी 'नेट'ची तात्पुरती उत्तरतालिका प्रसिद्ध

## राष्ट्रीय पात्रता परीक्षेच्या 2026 परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका जाहीर झाली आहे.

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, मुंबई : 22 ते 30 जूनदरम्यान झालेल्या विषयांच्या परीक्षेच्या उत्तरतालिकेवर उमेदवारांना 18 ऑगस्टपर्यंत हरकती नोंदवता येतील. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराला आव्हान देण्यासाठी 200 रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

उमेदवारांना उत्तरतालिकेसोबत 18 ऑगस्टपर्यंत हरकती नोंदवता येणार त्यांनी नोंदवलेल्या उत्तरांची पाहणी करून संबंधित प्रश्नाच्या उत्तरावर ऑनलाइन हरकत नोंदवता येईल. ही प्रक्रिया 16 ऑगस्टपासून सुरू झाली असून, 18 ऑगस्ट रोजी रात्री 11.59 वाजता बंद होईल.




हरकत नोंदवताना डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावे लागेल.

इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या तीन विषयांच्या प्रश्नपत्रिकांबाबत प्राप्त तक्रारींची पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या विषयांसंदर्भातील स्वतंत्र सूचना नंतर जाहीर केल्या जातील, असे एनटीएने स्पष्ट केले आहे. अद्ययावत माहितीसाठी उमेदवारांनी एनटीएचे https://www.nta.ac.in/ आणि यूजीसी नेटचे https://ugcnet.nta.nic.in/ हे संकेतस्थळ पाहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# यूजीसी-नेटच्या तीन पेपरची फेरपरीक्षा

नवी दिल्ली : नॅशनल टेस्टिंग एजन्सीने रविवारी यूजीसी नेट परीक्षेतील इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या तीन पेपरच्या फेरपरीक्षेची घोषणा केली. इंग्रजीचा पेपर 9 सप्टेंबर, सकाळी 9 ते दुपारी 12, तर वाणिज्यचा पेपर त्याच दिवशी दुपारी 3 ते सायंकाळी 6 या वेळेत होईल. समाजशास्त्राचा पेपर 10 सप्टेंबरला सकाळी 9 ते दुपारी 12 या वेळेत घेतला जाईल.

# 'सुंदर शाळा' स्पर्धेचा निकाल रखडला

## सहा महिन्यांपासून 2,610 शाळा पुरस्काराच्या प्रतीक्षेत

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, नागपूर : 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेच्या तिस-या टप्प्याचे मूल्यांकन फेब्रुवारीमध्ये पूर्ण होऊन सहा महिने उलटले तरी अद्याप निकाल जाहीर झालेला नाही. स्पर्धेसाठी निश्चित करण्यात आलेला निधी निधी अन्यत्रा, विशेषतः 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी वळवण्यात आल्याची चर्चा शिक्षण विभागात सुरू आहे. त्यामुळे निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या 2,610 शाळांमधील शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि शासकीय आश्रमशाळांचा एक गट, तर खासगी अनुदानित शाळांचा दुसरा गट अशा

**72 कोटींच्या पुरस्कारांची तरतूद**


या स्पर्धेतील विविध स्तरांवरील पुरस्कारांसाठी सुमारे 72.22 कोटी रुपयांची बक्षीस रक्कम निश्चित करण्यात आली आहे. स्पर्धेचे नियोजन, आयोजन, प्रचार-प्रसार आणि अंमलबजावणीसाठी आणखी सुमारे 14.50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मूल्यांकन पूर्ण करण्याचे नियोजन होते. त्यानुसार मूल्यांकन पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले तरी सहा महिने उलटूनही निकाल जाहीर झालेला नाही. दोन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली. बृहन्मुंबई क्षेत्र, अ व ब गटातील महानगरपालिका क्षेत्र आणि उर्वरित महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्र अशी विभागणीही करण्यात आली होती. शहर विभागातील तालुका, जिल्हा आणि महापालिका स्तरावर 246, ग्रामीण भागातील तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर 2,358, तर राज्य स्तरावर सहा शाळांना पुरस्कार देण्याचे नियोजन आहे.

निकालाला विलंब होण्यामागे आर्थिक कारण आहे का, निधी अन्य योजनांकडे वळवण्यात आला आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. मूल्यांकनानंतर निकालच जाहीर होत नसल्याने सहभागी शाळांचा हिरमोड झाला आहे.

'निकालाची प्रक्रिया शासन स्तरावर प्रलंबित आहे. कार्यवाही सुरू असून लवकरच निकाल जाहीर केला जाईल.'
- सचिंद्र प्रताप सिंह, शिक्षण आयुक्त.

# सीईटीच्या विद्यार्थ्यांनी प्रलंबित अर्जामधील त्रुटींची पूर्तता करावी !

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, नागपूर : जालना/प्रतिनिधी ः सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात राज्य सामाईक प्रवेश परिक्षेच्या आधारे आरक्षित जागेवर प्रवेश घेवू इच्छिणा-या अनुसूचित जाती, विजा-अ, भज, इमाव, विमाप्र, एसईबीसी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे इयत्ता 12 वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करण्याची कार्यवाही जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या स्तरावर सुरु आहे. त्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी त्रुटी पूर्तता करणेसाठी विशेष मोहिम समिती कार्यालयामार्फत हाती घेण्यात आली आहे. माहे जून 2025 ते जुलै 2026 या कालावधीत समितीकडे एकूण 14 हजार 520 अर्ज दाखल झाले होते, त्यापैकी तब्बल 12 हजार 690 इतक्या मोठ्या संख्येने वैधता प्रमाणपत्रे निकाली काढण्यात आली असून ती ऑनलाईन स्वरूपात वितरित करण्यात आली




आहेत. यात अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, एसईबीसी, विमाप्र व इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा व लाभार्थ्यांचा समावेश आहे. तसेच चालू आर्थिक वर्षात म्हणजेच एप्रिल 2026 पासून आजतागायत एकूण 4 हजार 300 लाभार्थ्यांना वैधता प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. वास्तविकतः जात वैधता प्रमाणपत्रासाठी कागदपत्रांची तपासणी ही अत्यंत वेळेची व गुंतागुंतीची प्रक्रिया असते. मात्र जालना समितीने ऑनलाईन व ऑफलाईन आलेल्या कागदपत्रांची अचूक तपासणी करून ही प्रक्रिया गतिमान केली आहे.

# शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या परीक्षेत विद्यार्थी नापास

कन्नड ऽ शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे हे 14 ऑगस्ट रोजी भांबरवाडी जिल्हा परिषद शाळेवर सकाळी दहा वाजेच्या सुमारास अचानक धडकले. त्यांनी विद्यार्थी आदेश फुरसने व शुभम राठोड यांना बालभारतीचे मराठीचे पुस्तक वाचण्यास सांगितले. ते वाचताना अडखळले. या वेळी शिक्षणमंत्री भुसे यांनी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षकांशी संवाद साधला.

# डॉ. काबरा यांची 19 हजार फुट उंचीवरील डोंगररांगातून विक्रमी सायकलिंग !

## भास्करराव अंबेकर यांच्याकडून माजी प्राचार्य डॉ. जवाहर काबरा यांचा सत्कार



अवघड डोंगररांगातून उत्कृष्ट सायकलींग केल्याबद्दल जालन्याचे माजी प्राचार्य डॉ. जवाहर काबरा यांचा माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी सत्कार केला. यावेळी उपस्थित बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, संजय अग्रवाल, दिनेश अग्रवाल, भरत गादीया, विजय शेंदरकर, बबनराव काजळे, जीवन खंडागळे आदी.

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना : शहरातील जेईएस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जवाहर काबरा यांनी वयाच्या 67 व्या वर्षी तरुणांनाही लाजवेल अशा उत्साहात सायकलिंग व मोठे साहस करून नावलौकीक केला आहे. युथ हॉस्टल्स असोसिएशन ऑफ इंडियाद्वारे आयोजित लेह उमलिंगला पास सायकल एक्सपीडिशन मध्ये सहभागी होऊन तब्बल 19 हजार 24 फूट उंचीवर डोंगररांगा सायकल वरून पार करण्याचा विक्रम केला. त्यांच्या या साहसी कामगिरीबद्दल शहराचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

प्राचार्य काबरा हे विद्यार्थी दशेतही अत्यंत उत्कृष्ट विद्यार्थी संघटक होते. तसेच सामाजिक उपक्रमातही त्यांचा सहभाग असायचा. त्यांनी रक्तदान करणारा एक मोठा गट उभा केला होता. जेईएस महाविद्यालयात विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून आपली ओळख निर्माण केली. तसेच त्याच महाविद्यालयात पुढे उत्कृष्ट प्राचार्य म्हणून त्यांची कामगिरी सरस होती. आता सेवानिवृत्तीनंतर वयाच्या 67 व्या वर्षी त्यांनी सायकलवर अत्यंत खडतर प्रवास करून मोठा विक्रम केला आहे. 365 किलोमीटरचा दुर्गम प्रवास त्यांनी सायकलवरून पूर्ण केला. लेह पासून सुरू झालेला हा प्रवास शारा, चुमाथांग, न्योमा, होले व चमूमले अशा विविध टप्प्यातून उमलिंगला पास पर्यंत पोहोचला. त्यांच्या या अतिशय खडतर साहसपूर्ण विक्रमी सायकलिंग बद्दल माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी त्यांचे विशेष कौतुक करून सत्कार केला. यावेळी माजी शहर प्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, संजय अग्रवाल, दिनेश अग्रवाल, भरत गादीया, विजय शेंदरकर, बबनराव काजळे, जीवन खंडागळे आदींची उपस्थिती होती.

# जेईएस महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त रामदास कामत यांची भेट

## 'आजादी की जंग, फिल्मों के संग' कार्यक्रमामध्ये देशभक्तीचा संचार



जेईएस महाविद्यालयात मागदर्शन करताना रामदास कामत

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना : भारताचे वीर जवान देशाचे रक्षण कसे प्राणपणाने करतात याचे अतिशय प्रेरणादायी चित्रवर्णन करत 'आजादी की जंग, फिल्मों के संग' या दृकश्राव्य कार्यक्रमाने जालनेकरांना नवी स्फूर्ती दिली. मुंबई येथील प्रख्यात वक्ते, लेखक व नाट्यदिग्दर्शक रामदास कामत यांनी शुक्रवारी जेईएस महाविद्यालयात हा कार्यक्रम सादर केला. भारताने शत्रूसोबत लढलेल्या घनघोर युद्धांचा ज्वलंत इतिहास कामत यांनी ओघवत्या वक्तृत्वातून आणि विविध चित्रपटांच्या दृश्यांमधून जिवंत केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, तसेच रंगकर्मी मिलिंद दुसे, सतीश लिंगडे, विनोद जैतमहाल, प्रा. बी. जी. श्रीरामे, प्रा. डॉ. यशवंत सोनुने आदींच्या प्रमुख उपस्थितीसह एनसीसीचे विद्यार्थी व प्राध्यापक याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा आणि आजवर लढल्या गेलेल्या युद्धांचा इतिहास सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचवणारा हा एक अप्रतिम कार्यक्रम आहे. आजच्या शालेय, युवा पिढीला, भारत चीन, भारत पाक युद्धात आपल्या शूर जवानांनी गाजवलेल्या अभूतपूर्व शौर्याचा परिचय व्हावा हाच यामागे उद्देश आहे, असे रामदास कामत यांनी या वेळी सांगितले. सेलिब्रिटी, हिरो या शब्दाचा नेमका अर्थ जाणून, खरे सेलिब्रिटी, हिरो कोण आहेत हे युवा पिढीला कळले पाहिजे.

कारण आपल्या जवानांच्या शौर्याची माहिती देणारे धडे शालेय पाठ्यपुस्तकात नाहीत, म्हणून या तरुण पिढीपर्यंत कामत यांनी शौर्यगाथा पोहोचवण्यासाठी 'किस्मत' 'हकीकत' ते 'उरी द सर्जिकल स्ट्राईक' पर्यंतच्या युद्धपटांतील निवडक दृश्यांचा या कार्यक्रमात समावेश केला आहे. हा कार्यक्रम पाहून सैन्यदलात जाण्याची आणि देशसेवा करण्याची प्रेरणा मिळाली, अशा प्रतिक्रिया या वेळी अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे महाकवी रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले संपूर्ण तीन ते साडेतीन मिनिटांचे राष्ट्रगीत रामदास कामत यांनी पडद्यावर दाखवून या कार्यक्रमाचा अतिशय रोमांचक समारोप केला.

### सर्व निधी सैनिकांच्या कल्याणासाठी

रामदास कामत यांना या कार्यक्रमासाठी मिळणारे संपूर्ण मानधन आणि प्रेक्षकांना आवाहन करुन जमा झालेली रक्कम ते सैनिक कल्याण निधीला देणगी देतात. त्याप्रमाणेच जालन्यातील कार्यक्रमाचे मानधन आणि जमा झालेली रक्कमही ते सैनिक कल्याण निधीला देणार आहेत. आजवर भारतभरात केलेल्या 14 प्रयोगांमधून मिळालेले सुमारे 8 लाख रुपये त्यांनी आर्मी वेल्फेअर फंडात जमा केले असून त्याबद्दल त्यांना देशाच्या संरक्षण विभागाकडून प्रशंसा पत्रही मिळालेले आहे.

### प्रेक्षकांच्या डोळयात क्षणोक्षणी नागरिकांच्या डोळ्यांत अश्रु

1962 भारत-चीन, 1947, 1965, 1971 आणि 1999 भारत-पाक या युद्धांचा इतिहास सांगत आणि शहीद, हिदुस्तान की कसम, बॉर्डर, गाझी अटॅक, एलओसी कारगिल या युद्धपटांतील दृश्ये दाखवत रामदास कामत यांनी प्रेक्षकांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत चेतवली. त्यांच्या तेजस्वी शब्दांनी प्रेक्षकांच्या अंगावर शहारे येत होते, युद्धाची दृश्ये पाहून रक्त सळसळत होते आणि जवानांचे बलिदान पाहून अभिमानाने क्षणोक्षणी नागरिकांच्या डोळ्यांत पाणी दाटत होते.

# रोटरी क्लब मिडटाऊनतर्फे मानेगाव शाळेला संगणक व 4 सायकल भेट



शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनतर्फे मानेगाव खालसा (ता. जालना) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधुनिक तंत्र्ज्ञानाची जोड देण्यासाठी शाळेला इन्व्हर्टरसह दहा संगणक संचाचे लोकार्पण करण्यात येऊन चार मुलींना सायकल भेट दिल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी रोटरी क्लबतर्फे शाळेला 10 संगणक संच सुपूर्द करण्यात येऊन संगणकासाठी आवश्यक शॉर्ट कीज व आवश्यक माहितीचे फ्लेक्स लावण्यात आले. खंडित विजेचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी जम्बो इन्व्हर्टर व बॅटरीची उपलब्ध करून देण्यात आली सुविधा देखील क्लबतर्फे

मानेगाव शाळेत कॉम्प्युटर शॉर्ट कीजच्या फ्लेक्सचे अनावरण झाले. आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांचे संगणक शिक्षण अधिक प्रभावी होईल, असा विश्वास रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे अध्यक्ष अलोक नानावटी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. ते म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात संगणक ज्ञान विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असून, यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया अधिक मजबूत होईल.

रोटरी व्हील्स ऑफ बायसिकल फॉर गर्ल्स या प्रांतीय उपक्रमांतर्गत कालिका स्टील अलाईजच्या सहकार्याने खूप 4 विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले. प्रारंभी क्लबचे अध्यक्ष आलोक नानावटी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास शालेय समिती अध्यक्ष नारायण जाधव, सरपंच ज्ञानेश्वर राठोड, उपसरपंच राधिका जाधव, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे सचिव मनमोहन भककड, सुरज गेही, प्रशांत बागडी, अमित शाह, पियुष अग्रवाल, पंकज अग्रवाल, अमोल जिंदल, मनोज अग्रवाल यांच्यासह पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक संतोष नागवडे यांनी केले.

# योगासन स्पर्धेत 40 पेक्षा अधिक खेळाडूंचा सहभाग

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, ः जालना/प्रतिनिधी ः श्री चैतन्य टेक्नो स्कूल, जालना येथे जालना योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या वतीने भव्य जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये 40 पेक्षा अधिक योग खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या उत्कृष्ट योग कौशल्याचे प्रदर्शन केले.

स्पर्धा एकूण चार प्रकारांमध्ये घेण्यात आली. यामध्ये ट्रेडिशनल योगासन, आर्टिस्टिक सिंगल, आर्टिस्टिक पेअर आणि रिदमिक पेअर या चार प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धेस प्रमुख अतिथी म्हणून श्री चैतन्य टेक्नो स्कूलचे संचालक आदित्य बगडिया उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे खेळाडूंना मोठे प्रोत्साहन मिळाले. संपूर्ण स्पर्धेचे नियोजन व आयोजन जालना योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव वैभव आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच असोसिएशनचे उपाध्यक्ष व टेक्निकल डायरेक्टर उमेश बजाज यांनी स्पर्धेच्या तांत्रि बाबी व कार्यभार अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएशनचे पदाधिकारी, पंच कमिटी, तांत्रि अधिकारी, स्वयंसेवक, खेळाडू व पालक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व सहभागी खेळाडूंचे तसेच सहकार्य करणा-या सर्वांचे असोसिएशनच्या वतीने आभार मानले.

Publisher and Owner Sandeep Narayan Thakre Printer Santosh Vishnu Bhutekar at Jagmitra offset, Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna 431203 ( Maharashtra ) Place of publication office Daily Shikshan Astra, Plot No.11, Varsha Niwas, Sukh-shanti Nagar Mantha Road, Jalna. 431203 ( Maharashtra ) Editor : Sandeep Narayan Thakre, 7972212030 RNI MHMAR/25/A0848 Email. Shikshanastra@gmail.com Advisory Body Adv.Adinath Kadam & Adv.Yogesh Somani, .

हे पत्र प्रकाशक, मालक संदिप नारायण ठाकरे यांनी मुद्रक संतोष विष्णु भुतेकर यांच्या जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजीनगर, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे छापुन दैनिक शिक्षण अस्त्र, कार्यालय प्लॉट नं 11, वर्षा निवास, सुख शांती नगर, मंठा रोड, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले आहे. संपादक ः संदिप नारायण ठाकरे या अंकात प्रसिध्द झालेले मजकुर लेख व त्यामधुन होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. सर्व वाद जालना न्यायालया अंतर्गत आर एन आय MHMAR/25/A0848 कायदेशीर सल्लागार ः ॲड.आदिनाथ राम कदम व ॲड.योगेश गणेश सोमाणी